# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // इतिवृत्तांत //

**श्री. संजय श्रीपतराव काटकर,** आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२०/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. आयुक्त कार्यालय, सभागृह येथे सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | परिवहन बस स्टँड जाहिरात व दुरुस्ती. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (परिवहन) | जे बस स्थानके स्थलांतरीत करावयाची आहेत ती स्थलांतरीत करणे व आवश्यकता नसलेली स्थानके काढून टाकावीत. | दि.४/३/२४ |
| २ | जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव. | **श्री. संभाजी पानपट्टे, अति आयुक्त (कर)** **श्री. संजय शिंदे, उपायुक्त (कर)** | १७६ पैकी २३ थकबाकीदारांनी पैसे भरले आहेत. ५३ थकबाकीदारांच्या मालमत्ता महापालिकेच्या नावे करण्यासाठी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असे उपायुक्त (कर) यांनी बैठकीत सांगितले. उर्वरित मालमत्ता देखिल महापालिकेच्या नावे करण्यासाठी प्रस्ताव सादर करावा. | दि.२६/२/२४ |
| | | | तसेच जे मोठे थकबाकीदार आहेत. त्यांची नावे तसेच धनादेश न वटलेल्या थकबाकीदारांची नावे प्रसिध्द करावी. | दि.२३/२/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | कर व लेखा विभागातील वसुलीत आढळून येणारी तफावत (ताळमेळ पत्रक तयार करणे). | **श्री. संभाजी पानपट्टे, अति आयुक्त (कर) डॉ. कालिदास जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी** | कर व लेखा विभाग यांनी आज सांय. ६.०० वा. चर्चा विनिमिय करुन प्रकरणाचा निपटारा करावा. प्रत्येक महिन्याला ताळमेळ पत्रक तयार करावे. | नियमित |
| ४ | दिव्यांग व महापालिका कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या घरा बाबत. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | महापालिका कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या घरांसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावेत.<br>तसेच दिव्यांगांना द्यावयाचे घरासाठी रु.१०० रजिस्ट्रेशन फी भरणेबाबतच्या प्रस्तावास मुद्रांक शुल्क अधिकारी यांचेकडून मंजूरी प्राप्त करुन घेणे. | दि.४/३/२४ |
| ५ | चौकशी अधिकारी यांनी दिलेले निकाल. (त्याची पडताळणी) | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या निकालाची पडताळणी करुन अहवाल द्यावा. (लेखापरिक्षण आक्षेपाबाबत शासनास अहवाल सादर करावा.) | दि.२६/२/२४ |
| ६ | STP प्लांट मधील पाण्याचा वापर | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | MMRDA व महापालिके मार्फत सुरु असलेली विकास कामे तसेच सखोल स्वच्छता अभियानामध्ये महापालिकेच्या STP प्लांट मधील पाण्याचा वापर करणे बंधनकारक राहिल. | नियमित |
| ७ | महापालिका आस्थापनाची सखोल स्वच्छता कार्यक्रम | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी साफ-सफाई करणे. | नियमित |
| ८ | महापालिका मालकीचे मार्केट दुरुस्ती/वापर – ५% दिव्यांगाना देणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | मार्केट मधील दुरुस्तीची कामे करुन घेणे.<br>रस्त्यावरील फेरीवाल्यांना मनपा मार्केट मध्ये स्थलांतरीत करणे. | दि.४/३/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | संडे गार्डन करीता नाविन्यता आणण्यासाठी सुचना. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (उद्यान) | संडे गार्डन या संकल्पेतून सुरु असलेल्या उपक्रमाची दि.२५/०२/२४ रोजी सांगता होणार आहे. या दिवशी या उपक्रमात नाविन्यता येण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंटचा सहभाग घ्यावा. त्याची प्रसिध्दी सर्व जेष्ठ नागरीक केंद्र व उद्यानात करावी. | दि.२५/२/२४ |
| १० | जॉब चार्ट प्रमाणे कामाचे मुल्यांकन. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | HR agency नेमावी. | -- |
| ११ | MBMC@२०४७ | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | Capacity building विषयांसाठी वक्ता नेमणे.<br>City Branding EOI प्रसिध्द करणे. | दि.२६/२/२४ |
| १२ | बीएसयुपी इमारतीमधील समस्या. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | स्थानिक रहिवाशी अथवा महापालिकेने संस्था नेमून ब्रीएसयुपी इमारतीच्या मेन्टेनन्सचे काम देण्याबाबतचे धोरण निश्चित करावे. | दि.२६/२/२४ |
| १३ | सेवा करारावर घेतलेल्या अधिकारांच्या कामाचा आढावा | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | मुल्यमापन करण्याच्या कामासाठी विहीत नमुना तयार करणे. HR agency ची नेमणूक करणे. | दि.४/३/२४ |
| १४ | सफाई कामगारांची वैद्यकिय तपासणी | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | सफाई कामगारांच्या वैद्यकिय तपासणीचे आयोजन करावे. | दि.४/३/२४ |
| १५ | One click attendance. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त<br>श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (घन. व्यवस्था)<br>श्री. सुधीर नाकाडी, मुलेप | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन त्वरीत अंमलबजावणी करावी. चर्चा करावी. | -- |
| | | श्रीम. सई वडके, विधी अधिकारी | | दि. २१/२/२४ |
| १६ | सफाई कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी देणे. | **श्री अनिकेत मानोरकर अति. आयुक्त (घन. व्यवस्था)** | अतिरिक्त आयुक्त (घन. व्यवस्था.) यांनी बैठकीत सांगितले नुसार लेखा विभागाने | दि.२६/२/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही करावी. | |
| १७ | मनपा अधिकाऱ्यांना शाळा दत्तक देणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (शिक्षण) | प्रत्येक अधिकारी यांनी महापालिका शाळा व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासासाठी नियोजन करावे. | नियमित |
| १८ | १५ वित्त आयोग अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्र सुरु करणे. (असमाधान काम असल्याचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे पत्र) १५ फेब्रुवारी २०२४ मुदत | **श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.आ.) डॉ. दुधभाते, मु.आ.अधि.** | महापालिका कार्यक्षेत्र व आरोग्य केंद्र यांची संख्या तसेच मिरा भाईंदरचे शहरीकरण झाले असून प्रत्येक इमारतीमध्ये खाजगी दवाखाने सुरु आहेत. नागरीक त्याचा लाभ घेत असल्याने अधिकचे आरोग्य केंद्र सुरु करणे शक्य होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी बैठकीत सुचित केले. त्यानुसार आरोग्यवर्धिनी केद्रांबाबत शासनाकडे फेर प्रस्ताव पांठवावा. | दि.२३/२/२४ |
| १९ | मालमत्ता कर वसुली | सर्व नियंत्रण अधिकारी | महापालिकेची थकबाकी वसुलीसाठी नियोजन करावे. स्वत: मोठया थकबाकीदारांना भेटी द्याव्यात. तसेच कर लिपीक यांनी केलेल्या चुका पुढील बैठकीत निदर्शनास आणून द्याव्यात. येत्या शुक्रवारी आढावा बैठक घेण्यात येणार आहे. | दि.२३/२/२४ |
| २० | स्टार सोसायटी स्पर्धा | **श्री. अनिकेत मानोरकर अति. आयुक्त (सार्व. आ.)** | यापुर्वी महापालिकेने आयोजित केलेल्या स्पर्धा प्रमाणे या वर्षी स्टार सोसायटी स्पर्धाचे नियोजन करावे. प्रसिध्दी द्यावी. | दि.२६/२/२४ |
| २१ | नालेसफाई कामांची पहाणी. | **श्री. अनिकेत मानोरकर अति.आयुक्त श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (घन व्यवस्था)** | नाविन्यता कक्षातील नेमलेल्या सिव्हील इंजिनियर मार्फत स्थळ पहाणी करुन अहवाल देणे. | दररोज |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | कनिष्ठ अभियंता नेमणेबाबत निविदा काढणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध.) | निविदा प्रक्रिया सुरु करावी. | -- |
| २३ | **फायर ऑडीट** महापालिका कार्यालय/शाळा/ खाजगी क्लासेस | **श्री. संजय शिंदे , उपायुक्त (अग्निशमन)**<br>**श्री. प्रकाश बोराडे, मुख्य अग्निशमन अधिकारी** | महापालिकेच्या आस्थापनांचे फायर ऑडीट झाले असून खाजगी आस्थापनांचे काही प्रमाणात फायर ऑडीट होणे बाकी असल्याचे उपायुक्त (मु.) यांनी सांगितले.<br>उर्वरित खाजगी आस्थापनांचे लवकरात लवकर फायर ऑडीट करुन घ्यावे. | दि.४/३/२४ |
| २४ | महापालिका वर्धापन दिन साजरा करणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | सार्वजनिक रजेच्या दिवशी आयोजित करणे. महापालिका अधिकारी / कर्मचारी, महापालिका शाळेतील मुले यांच्या सहभागातून वर्धापन दिन साजरा करावा. | -- |
| २५ | मनपा वाहन चालक यांचे आरोग्य परिक्षण अहवाल. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | महापालिका व ठेक्यावरील सर्व वाहन चालकांची वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी. | दि.२६/२/२४ |
| २६ | स्टार शाळा | श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (शिक्षण) | स्टार सोसायटी प्रमाणेच स्टार शाळेचे नियोजन करावे. त्याची प्रसिध्दी द्यावी. | दि.२६/२/२४ |
| २७ | अग्निशमन वाहनांची दुरुस्ती व निगा बाबत. | **श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (अग्निशमन)** | महापालिकेने एक सॉफ्टवेअर तयार करणे यामध्ये प्रत्येक वाहनाची माहिती त्यामध्ये दुरुस्ती व इतर नोंदी नमुद कराव्यात.<br>उपायुक्त (वाहन) यांनी १०० टक्के सर्व वाहनांचा सर्वे करावा. त्या सुस्थितीत असल्याचा अहवाल सादर करावा. | दि.२६/२/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | न्यायालयीन प्रकरणात वकीलांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्रीम. सई वडके, विधी अधिकारी<br>सर्व प्रभाग अधिकारी | विधी अधिकारी यांनी न्यायालयात दावा लढविण्यासाठी नियुक्त केलेल्या वकीलांना प्रत्येक प्रभाग अधिकारी यांनी संपर्क करुन न्यायालयीन कामकाजासाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे आदेश उपायुक्त (मु.) यांनी निर्गमित करावेत. न्यायालयीन निकालांची अंमलबजावणी करण्यामध्ये होणारा विलंब व कसूर हा महापालिका व जनतेच्या हिताचा नसून यासाठी पर्यवेक्षण पध्दती निश्चित करण्यात यावी. | नियमित |
| २९ | अभिलेखांचे वर्गीकरण | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | उर्वरित विभागाच्या अभिलेखांचे लवकरात लवकर वर्गीकरणाचे काम पुर्ण करावे. | दि.४/०३/२४ |
| ३० | ठेका कर्मचारी चारित्र्य पडताळणी | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | अद्याप सर्व कर्मचाऱ्यांचा चारित्र्य पडताळणीचा अहवाल येणे प्रलंबित आहे. ज्या ठेकेदारांकडील कर्मचाऱ्यांचा अहवाल अप्राप्त आहे त्यांना पत्राव्दारे सुचित करावे. | दि.२६/२/२४ |
| ३१ | बेवारस वाहने शोध/ लिलाव | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | अद्यापही काही रस्त्यांवर बेवारस वाहने आढळून आली आहेत. सर्व प्रभाग अधिकारी यांनी स्थळ पहाणी करुन १०० टक्के बेवारस वाहने उचलून घ्यावीत. | नियमित |
| ३२ | अग्रीम समायोजन | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | प्रतिनियुक्ती वरील कर्मचाऱ्यांच्या आस्थापनांकडे वारंवार पत्राव्दारे पाठपुरावा करावा. | नियमित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | तसेच महापालिका अधिकारी यांचे वेतनातून अग्रीम रक्कम वसुल करुन घ्यावी. | |
| ३३ | घनकचरा वर्गीकरण करण्यासाठीचा तयार करण्यात आलेला क्यु आर कोड मध्ये कर व पाणी पुरवठा बीलाचा समावेश करणे. | **श्री. संजय शिंदे, उपायुक्त (कर)**<br>**श्री. दिपक खांबित, शहर अभियंता**<br>**श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (घन कचरा व्यवस्था.)** | कर विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी IT Act नुसार आपला डाटा सुधारणेसह श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त यांचेकडे उपलब्ध करुन द्यावा. | दि.४/३/२४ |
| ३४ | शहरातील डासांचे वाढते प्रमाण. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (सा.आ.) | डास उत्पती केंद्रांचा सर्वे करणे. यासाठी नाविन्यता कक्षातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य घ्यावे. | दि.२६/२/२४ |
| ३५ | सेवानिवृत्त शिक्षकांचे नियतकालीन निवृत्ती वेतन व अनुषांगिक लाभ देणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण)<br>श्रीम. सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी | महापालिका स्तरावरील प्रलंबित प्रकरणांची लवकरात लवकर पुर्तता करावी. शासनाकडील निधीसाठी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करावा. | दि.४/३/२४ |
| ३६ | इंदिरा गांधी रुग्णालयात डायलिसीस मशीन बसविणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (सार्व. आ.)<br>डॉ. नंदकिशोर लहाने, प्र.मु.वै.आ.अ. | शवपेटया काढून त्यांचे मुल्यांकन करुन लिलाव करावा. नवीन डायलेसिस विभाग १/३/२४ रोजी सुरु होईल याची खबरदारी घ्यावी. | दि.१/३/२४ |
| ३७ | मालमत्ता रजिस्टर तयार करून माहिती सादर करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (मिळकत) | मालमत्ता रजिस्टर अद्ययावत करावे. तसेच त्यांच्या संगणकात नोंदी घ्याव्यात. त्या-त्या मालमत्ता करीता पालक अधिकारी निश्चीत करावेत. तसा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर करावा. | दि.४/३/२४ |
| ३८ | मैदाने भाडयाने देणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | MRTP Act नुसार खेळाची मैदाने इतर कार्यक्रमासाठी फक्त ३० दिवस देण्याचे प्रयोजन आहे. करिता यापुर्वी ज्या ज्या संस्थांनी कार्यक्रमासाठी मागणी केली | दि.२६/२/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आहे त्यांना पत्राव्दारे अवगत करावे. ऑन लाईन बुकींगसाठी सॉफ्टवेअर तयार करुन घेणे. | |
| ३९ | नविनता कक्षाचा जॉब् चार्ट तयार करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) | नाविन्यता कक्षासाठी घेतलेले अधिकारी यांचा संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी आढावा घ्यावा. त्यांची योग्यता तपासावी. तद्नंतर त्यांना जॉब चार्ट तयार करुन द्यावा. सदर विभागाचे कामकाज हे थेट उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) यांचे मार्फत आयुक्तांकडे राहिल. नाविन्यता कक्षासाठी अपेक्षिलेली माहिती व त्याचा पाठपुरावा आयुक्त कार्यालयातील श्री. सतिश भरसट यांचे मार्फत करण्यात येईल. | दि.२६/२/२४ |
| ४० | स्टॉल वितरण धोरण | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | स्टॉल लावण्यासाठी परवानगी देण्यात येणाऱ्या जागेचे जीओ टॅगिंग करणे व त्या त्या जागेसाठी लकी ड्रॉ काढणे. | दि.४/३/२४ |
| ४१ | शहरात सिसिटीव्ही यंत्रणा बसविणे. प्रस्ताव व कार्यवाही | **श्री. रवि पवार, उपायुक्त श्रीम. मनस्वी म्हात्रे, वि.प्र.(cctv)** | शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याचा सातत्याने पाठपुरावा करावा. | नियमित |
| ४२ | स्टेशनरी खर्चात कपात | श्री. रवि पवार, उपायुक्त उपायुक्त (भांडार) | दि.२/१०/२३ ते दि.१/४/२४ या कालावधीत स्टेशनरी खर्चात झालेल्या कपातीची माहिती पुढील बैठकीत सादर करावी. | दि.२६/४/२३ |
| ४३ | खाद्य पदार्थ विक्री करुन जाताना घाण करणाऱ्याकडून दंडाची रक्कम वसुल करणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | मिठाई विक्रेता दुकानासमोर सकाळच्या वेळी मोठया प्रमाणात घाण दिसून येते. याबाबत सक्त ताकिद देवून दंडात्मक कारवाई करावी. | नियमित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | नवीन जागेवर पे ॲण्ड पार्क सुरु करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (P&P)<br>श्री. शहर अभियंता, शहर अभियंता | नाविन्यता कक्षातील कर्मचाऱ्याची नवीन ठिकाणे शोधण्यासाठी नेमणूक करणे. नव्याने शोध घेतलेल्या जागेचा जीओ टॅगिंग करणे. | दि.४/३/२४ |
| ४५ | झाडांच्या पालापाचोळा व फांद्यांवरील प्रक्रिया केंद्र. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) | निविदा प्रक्रिया पुर्ण करावी. तसेच दुसऱ्या प्रकल्पासाठी देखिल या जागेपैकी काही जागा उपलब्ध करुन द्यावी. | -- |
| ४६ | गार्डन मधील तुटलेली खेळणी/साहित्य | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) | लवकरात लवकर निविदा प्रकिया पुर्ण करावी. | -- |
| ४७ | पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, ठाणे यांचे पत्र दि.०८/०२/२४ मनपा प्रभाग निहाय आलेले अर्ज (२२) ची दखल घेवून आवश्यक कार्यवाही करावी. | -- |
| ४८ | कबड्डी टीम | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, क्रिडा अधिकारी | १४ खेळाडूंची टीम तयार कंरण्यासाठी प्रसिध्दी देणे. | दि.४/३/२४ |
| ४९ | स्पोर्टस् कॉम्पलेक्स मध्ये भाग घेत असलेल्या लाभार्थ्यांची नावे | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी | ज्या व्यक्तीने लाभ घेतला आहे त्याची माहिती प्रसिध्द करावी. तसेच अधिकाधिक खेळाडूंनी या योजनेचा लाभ घ्यावा याकरीता आयुक्तांचे आवाहन प्रसिध्द करावे. | दि.२३/२/२४ |
| ५० | पीएम स्वनिधी | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी | शासनाने दिलेल्या ईष्टांकापेक्षा अधिक काम झाल्याचे उपायुक्त यांनी बैठकीत सांगितले. नियमित ईष्टांकाची पुर्तता होईल याची दक्षता घ्यावी. माहिती अद्यावत ठेवावी. | नियमित |
| ५१ | सर्व मालमत्तांचे एनर्जी ऑडीट/स्ट्रक्चरल ऑडीट. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | लवकरात लवकर ऑडीट करुन पुर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत. | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२ | पाणपोई, सेल्फी पॉईंट संस्थांना चालविण्यासाठी देणे. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | महापालिकेने निविदा प्रकिया पार पाडावी. | -- |
| ५३ | शहरातील ट्राफिक सिग्नल यंत्रणा अहवाल. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | ट्राफिक इंजिनियर ला सर्वेचे काम देणे. | दि.४/३/२४ |
| ५४ | Water and electrical audit | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | महापालिकेने निविदा प्रकिया पार पाडावी. | दि.४/३/२४ |
| ५५ | एल ई डी दिवे बसविणे. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | लवकरात लवकर कार्यवाही पुर्ण करावी. | -- |
| ५६ | रत्यावरील झाकणे बदलणे/दुरुस्ती | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | ठिकठिकाणी रस्त्याची विकास कामे सुरु आहेत. त्यामुळे नागरीक व दुचाकी वाहने ही पदपथावरुन ये-जा करीत आहेत. कोणत्याही ठेकेदारांनी रस्त्याची कामे सुरु आहेत त्याठिकाणी बॅरकेटींग केल्याचे दिसून येत नाही. त्यांना नियमानुसार सुरक्षा उपाययोजना करण्याचे सुचित करावे. त्यांची जबाबदारी निश्चीत करावी. तसेच बांधकाम विभागाने पदपथावरील, नाल्यावरील झाकणे तपासून जेथे दुरुस्ती करावयाची असेल ती दुरुस्त करावे. जेथे नाहीत तेथे नवीन झाकणे बसवावीत. | नियमित |
| ५७ | पशु वैद्यकिय दवाखान्यातील घाण रस्त्यावर येणे. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध) | विभागाने लवकरात लकवर निविदा प्रकिया पार पाडावी. | -- |
| ५८ | सेल्फी पॉईट वरील माजी सदस्यांच्या नावात एकसारखे पणा आणण्याबाबत. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध.) प्रभाग अधिकारी | महापालिकेच्या सर्व सेल्फी पाईट, नावाच्या पाटया व मालमत्ता यांची रंगसंगती एकच निश्चीत करावी तसेच त्यावरील अक्षरांचा आकार | दि.४/३/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | निश्चीत करण्यासाठी धोरण तयार करावे. | |
| ५९ | सोलार प्लांट | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | महापालिकेने निविदा प्रकिया पार पाडावी. | नियमित |
| ६० | महापालिकेकडे हस्तांतरीत करावयाच्या जागा | संसंनर<br>शहर अभियंता | महापालिका आरक्षण असलेल्या जागा अद्याप ताब्यात घेतलेल्या नाही त्याजागा लवकरात लवकर हस्तांतरण करुन घेण्याची कार्यवाही करावी. | दि.४/३/२४ |
| ६१ | टीडीआर दिलेल्या जागा ताब्यात न घेणे. | ससं, नर | दस्तावेज तपासून टीडीआर दिलेला आहे. परंतु जागा ताब्यात आलेल्या नाहीत, अशा जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु करावी. | दि.४/३/२४ |
| ६२ | महापालिकेच्या सर्व प्रकल्पांचे ऑडीट करणे. | श्री. सुधीर नाकाडी, मुलेप. | महापालिकेचे सर्व प्रकल्प, मालमत्ता यांचे मुल्यांकन करुन त्यांवर संचालनासाठी येणारा खर्च याचे लेखापरिक्षण करुन अहवाल तयार करावा. यासाठी नाविन्यता कक्षातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य घ्यावे. | -- |
| ६३ | संगणक आज्ञावली/प्रणालीचे त्रयस्त संस्थेकडून ऑडीट करणे. | श्री. सुधीर नाकाडी, मुलेप. | NIC कडून संगणक आज्ञावली/प्रणालीचे लेखा परिक्षण करुन घ्यावे. | दि.४/०३/२४ |
| ६४ | कामगारांचे वेतन | सर्व खाते प्रमुख | ठेक्यावरील कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन मिळवून देणेबाबत अधिकाऱ्यांना मध्ये उदासिनता दिसून येते. अधिकाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करणे आवश्यक आहे.<br>महापालिकेस कामगार पुरविठा करणाऱ्यांना ठेकेदारांना त्यांनी प्रत्येक महिन्याच्या १० ता. पर्यंत कर्मचाऱ्यांना वेतन करुन १५ | दि.२६/२/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ता. पर्यंत PF, ESIC ता. भरणा करुन १६ तारखेस देयक प्रदानासाठी सादर करण्याबाबत पत्र देणे. त्यानंतर मागणी बील प्राप्त झाले नाही तर बीलाचा विचार केला जाणार नाही असे नमुद करणे.<br>तसेच अद्यापपर्यंत ठेकेदारांना देण्यात आलेल्या नोटीसींची माहिती विधी अधिकारी यांचेकडे देणे. विधी अधिकारी यांनी नोटीशींतील त्रुटीच्या अनुषंगाने अभिप्राय द्यावेत. | |
| ६५ | ठेकेदारांनी ठेक्यावरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी स्वतंत्र खाते उघडणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति आयुक्त<br>श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | अद्यापही काही खातेदारांनी ठेक्यावरील कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र उघडलेले नाही, असे बैठकी दरम्यान निदर्शनास आले. तरी संबंधित ठेकेदारास तात्काळ कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र खाते उघडणेबाबत सूचित करावे. | दि.२६/२/२४ |
| ६६ | पर्यावरण पुरक गणपती मुर्ती बाबत जागृकता | श्री. अनिकेत मानोकर, अति. आयुक्त<br>श्री. संजय शिंदे, उपायुक्त | पर्यावरण पुर्वक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी गणपती मंडळ व मुर्तीकार आणि मुर्ती विक्रेता यांची बैठक आयोजित करावी. | दि.४/३/२४ |
| ६७ | निवडणूक आयोगाकडील प्राप्त सुचनांची अंमलबजावणी करणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त,<br>शहर अभियंता | निवडणूक प्रक्रिया सुनियोजित पणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन करावे. | दि.४/३/२४ |
| ६८ | निवडणूक आयोगाकडील मार्गदर्शक सुचनेनुसार आचार संहिता कालावधीत | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता<br>सर्व प्रभाग अधिकारी | प्रभाग अधिकारी यांनी त्यांच्या प्रभागातील वास्तुच्या स्थळ पहाणी करावी. आचार संहिता कालावधीत मतदारांना प्रभावीत होणाऱ्या वास्तुंची | दि.४/३/२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पक्षांचे चिन्ह व नावे छाकणे. | | यादी तयार करुन शहर अभियंता बांधकाम यांचेकडे द्यावी. | |

उपरोक्त सुचनांची विहीत मुदतीत अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी. पुढील बैठकीत या विषयांचा आढावा घेण्यात येईल.

(**संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व संबंधित अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका.